महासागर ●शनिवार,दि.१३ सप्टेंबर २०२५

अकोला पान ३



# अल्पवयीन मुलीवरील बलात्कारानंतर सकल हिंदू समाजाचा एल्गार

- अल्पवयीन मुलीवरील बलात्कारानंतर सकल हिंदू समाजाचा एल्गार : १०,००० पेक्षा अधिक हिंदू रस्त्यावर!
- अटक केलेल्या आरोपीला फाशी द्या
- लव्ह जिहाद विरोधी कायदा करा'
- हिंदू धर्म योद्धा माननीय आमदार संग्राम जगताप यांची मागणी








▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :

**येथील डाबकी रोड परिसरात एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर झालेल्या बलात्कारानंतर संपूर्ण अकोला शहर हादरले आहे. या घटनेच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाने अभूतपूर्व एकजूट दाखवत प्रचंड 'हिंदू जनआक्रोश मोर्चा' काढला. श्री राजेश्वर मंदिरापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत निघालेल्या या मोर्चात १०,००० पेक्षा जास्त हिंदू बांधव सहभागी झाले होते.**

त्याचवेळी पोलिसांनी देशभरात ५००० किलो मीटरचा पाठलाग करून आरोपीला अटक केली आहे. मोर्चात 'आरोपीला तात्काळ फाशी झालीच पाहिजे' आणि 'जलदगती न्यायालयात खटला चालवा' या मागण्यांनी जोर धरला. या वेळी अहिल्यानगरचे हिंदू धर्मयोद्धा आमदार संग्राम जगताप यांनी महाराष्ट्रात 'लव्ह जिहाद विरोधी कायदा' तातडीने लागू करण्याची जोरदार मागणी केली.सकल हिंदू समाजातर्फे जन आक्रोश मोर्चाचे आयोजन ची घोषणा केल्यानंतर पोलिसांवर दबाव वाढला व आरोपीला अटक करण्यात आली असे ते भाषणात म्हणाले. या वेळी विविध हिंदुत्वनिष्ठ संघटना सहभागी झाल्या होत्या. मोर्चाच्या मार्गावरील दुकानदारांनी आपली दुकाने समर्थनार्थ बंद केली. माता भगिनी आपल्या लहान मुलांना कडेवर घेऊन मोर्चामध्ये सामील झाल्या.अकोला शहराला काळिमा फासणारी ही संतापजनक घटना ६ सप्टेंबर रोजी डाबकी रोड परिसरात घडली. आई-वडिल गणेशविसर्जनासाठी बाहेर गेलेले असतांना त्या संधीचा लाभ घेत आरोपी तौहिदखान समीरखान बैद (वय २८) याने पीडित अल्पवयीन मुलीच्या घरात जबरदस्तीने घुसून चाकूचा धाक दाखवला आणि तिच्यावर पाशवी बलात्कार केला. या अमानुष कृत्यामुळे संपूर्ण अकोला शहरात संतापाची लाट उसळली आहे. आरोपीला कठोर शिक्षा होण्यासाठी शहरातील वातावरण संवेदशील झाले होते. हिंदूंनी जनआक्रोश मोर्चा काढण्याचे ठरवल्यानंतर घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ४० जणांचे विशेष पथक स्थापन करण्यात आले. या पथकाने आरोपीला मध्यप्रदेशातून अटक करण्यात आली. हिंदू जनआक्रोश मोर्चाच्या समारोपात जिल्हाधिकाऱ्यांना सकल हिंदू समाजाच्या वतीने एक निवेदन सादर करण्यात आले. यात प्रशासनापुढे काही महत्त्वपूर्ण मागण्या ठेवण्यात आल्या:

- आरोपीवर पोक्सो कायद्यांतर्गत कठोर कारवाई करून खटला जलदगती न्यायालयात (Fast Track Court) चालवावा.
- नराधम आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी.
- आरोपीचे घर बुलडोजरने उद्ध्वस्त करण्यात यावे. जेणेकरून अशा लोकांवर जरब बसेल.
- अशा नराधम आरोपीला कोणत्याही समाज किंवा धर्मगुरूने पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावरही सहआरोपी म्हणून गुन्हे दाखल करावेत.
- पीडित मुलगी आणि तिच्या कुटुंबाला २५ लाख रुपयांची आर्थिक मदत,पोलीस संरक्षण आणि पूर्ण कायदेशीर सहाय्य पुरवावे.
- उत्तर प्रदेश व राजस्थान या राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही जन्म ठेपेची शिक्षा देणारा कठोरतम असा 'लव्ह जिहाद विरोधी कायदा' त्वरित लागू करावा. त्याचा अध्यादेश काढावा.'मागण्या मान्य झाल्याशिवाय शांत बसणार नाही'या घटनेमुळे अकोला शहर आणि संपूर्ण हिंदू समाज अत्यंत अस्वस्थ, भयग्रस्त आणि संतप्त आहेत. या घटनेची गंभीर दखल घेऊन वरील मागण्यांची त्वरित पूर्तता करावी. जर आरोपीवर तातडीने कठोर कारवाई झाली नाही, तर समाजात मोठा असंतोष निर्माण होईल; प्रशासनाची प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल. आम्ही पुन्हा स्पष्ट करू इच्छितो की, आमच्या बहिणी-मुलींची सुरक्षा हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे आणि पीडितेला न्याय मिळेपर्यंत संपूर्ण हिंदू समाज शांत बसणार नाही. आजचा मोर्चा ही तर सुरूवात आहे. यानंतर 'अकोला शहरात तीव्र आंदोलने केली.

## बलात्कारी तौहीद खानला अटक

▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :

यातील फिर्यादी ही अल्पवयीन असुन गणेश विसर्जन करणे कामी फिर्यादी यांचे घरातील सर्व सदस्य श्री. गणेश विसर्जन करीता गेले असता अल्पवयीन फिर्यादी ही घरी एकटी हजर असल्याच्या संधीचा फायदा घेत आरोपी नामे तौहिदखान समीरखान बैद वय २८ वर्ष, रा खैर मोहम्मद प्लॉट, डाबकी रोड, अकोला याने पीडीतेच्या घरात जबरदस्तीने प्रवेश करून पिडीतेला चाकुचा धाक दाखवत जबरीने लैगिंक अत्याचर केला. या बाबत फिर्यादीचे जबानी रिपोर्टवरून पो रटे डाबकी रोड येथे गुन्हा दाखल करून तपासात घेतला होता.घडलेल्या गुन्हयाचे गांभीर्य पाहता मा. पोलीस अधीक्षक सा. अकोला श्री. अर्चित चांडक यांनी मा. पोलीस निरीक्षक शंकर शेळके, स्था.गु.शा. अकोला. यांना आरोपी याचा शोध घेउन तात्काळ अटक करणे कामी पथक तयार करण्याचे आदेश दिले वरून पोलीस निरीक्षक श्री. शंकर शेळके, स्था. गु.शा. यांचे मार्गदर्शनात पो.स्टे. डाबकी रोड व स्थानिक गुन्हे शाखा अकोला यांचे



चार पथक तयार करून विविध ठिकाणी व वेगवेगळ्या राज्यात आरोपी शोध घेण्यासाठी रवाना करण्यात आले.गठीत केलेल्या स्था. गु.शा. अकोला पथक यांना आरोपी हा सुरत येथे जाणार असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली होती वरून मा. पोलीस अधीक्षक सा. श्री. अर्चित चांडक यांचे आदेशाने व पोलीस निरीक्षक स्था. गु. शा. श्री. शंकर शेळके यांचे मार्गदर्शनात एक पथक तात्काळ स्वरूपात सुरत,गुजरात राज्य येथे रवाना करण्यात आले. स्था.गु.शा. अकोला पथक सुरत येथे पोहचुन आरोपी याचे नातेवाईकांकडे जाउन शोध घेतला असता आरोपी याने त्याचे जवळ असलेला मोबाईल त्याचे बहिणीचे घरी सोडुन तेथुन निघुन गेला होता. आरोपीने वापरात असलेला मोबाईल सुरत येथे ठेवल्यामुळे त्याचा शोध घेणे आव्हानात्मक झाले होते.

## जिल्ह्यात पुढील पाच दिवस पाऊस हवामान केंद्राचा अंदाज

▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :

जिल्ह्यात आजपासून दि. १६ सप्टेंबरपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे. पावसामुळे नदी, नाले व तलाव यामध्ये जलसाठा जमा झाला आहे. अनावश्यकपणे पाण्यात जाण्याचे धाडस करू नये. नदी, अज्ञात किंवा खोल पाण्यात जाऊ नका. विजेच्या तारा आणि गटारींपासून दूर राहा. नदी, तलाव, धरण याठिकाणी अनावश्यकपणे जाऊ नये.पुरग्रस्त भागातून वाहने नेऊ नका. कारण पुराच्या पाण्यामुळे रस्त्यांचा अंदाज येत नाही. अवघ्या अर्धा मीटर पाण्यामध्ये वाहून जाण्याची शक्यता आहे. पुरस्थितीच्या अनुषंगाने पाणीसाठ्याजवळ सेल्फी काढण्याचा मोह करू नये. विज, वारा व पाण्यापासून बचावाकरिता सुरक्षीत ठिकाणी आश्रय घेण्यात यावा. अशास्थितीत झाडाखाली आश्रय घेऊ नये. नदीकाठाजवळील गावातील ग्रामस्थांना सतर्कतेची सुचना देण्यात आले आहे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अकोला जिल्हा परिषद अध्यक्षपद अनुसूचित जमाती महिलासाठी राखीव

▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :

काही दिवसातच जिल्हा परिषद बिगुल वाजणार आहे. यासाठी सर्व पक्षांनी तयारी सुरू केली आहे. अध्यक्षपदी निवडीची चर्चा सुरू होती. दरम्यान, आज महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेचे अध्यक्षपदाचे सदस्यत्व आले आहे. अकोला जिल्हा परिषद अध्यक्षपद अनुसूचित जमाती (महिला) राखीव आहे. बुलढाणा, यवतमाळ या निवडणूक अध्यक्षपदासाठी निवड रद्द करण्यात आली आहे. कोणत्या कोणते कोणते? १. ठाणे सर्वसाधारण (महिला) २. पालघर अनुसु सूचित जमाती -३. रायगड- मूल्य ४. रत्नागिरी - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) ५. सिंधुदुर्ग मूल्य ६. नाशिक सर्वसाधारण ७. धुळे - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)८. नदूर- अनुसूचित जमाती ९. जळगाव- दर्जेदार जमाती ९. अहिल्यानगर अनुसूचित जमाती (महिला) ११. १२. सातारा- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) १३. सांगली श्रेणी (महिला) १४. सोलापूर नागरिकांचा मागास प्रवर्ग १५. कोल्हापूर- मूल्य (महिला) १६. छत्रपति संभाजीनगर - सर्वसाधारण-१७. जालना नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) १८. बीड अनुस्तित जाती (महिला) १९. हिंगोली अनुसूचित जाती २० नांदेड नागरिकांचा मागास प्रवर्ग२१. धाराशिव नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) - २२. लातूर मूल्य (महिला)- २३. अमरावती मूल्य (महिला) -२४. अकोला अनुसूचित जमाती (महिला) २५. परभाणी अनुसूचित जाती २६. वाशिम अनुसूचित जमाती (महिला) २७. बुलढाणा - सर्वसाधारण २८. यवतमाळ मर्यादित. नागपूर - नागरिकांचा मागास प्रवर्ग ३०. वर्धा- अनुसूचित जाती ३१. भंडारा नागरिकांचा मागास प्रवर्ग - ३२. गोंदिया दर्जा (महिला) - ३३. चंद्रपूर अनुसूचित जाती (महिला) जिल्हा जिल्हा परिषद निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. भाजपने मोर्चेबांधणी सुरू केलीआहे. इच्छुक उमेदवारही तयारी करत आहेत.

### आगामी उत्सव परवानग्यांसाठी 'एक खिडकी' प्रशासन आणि सार्वजनिक मंडळांची बैठक

## नियमांचे पालन करुन उत्सव साजरा करावा: जिल्हाधिकारी





▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :

सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यामध्ये नवदुर्गा उत्सव, विजयादशमी, धम्मचक्र प्रवर्तन दिन यासह विविध सण-उत्सव साजरे होत असून या काळामध्ये प्रशासनाच्या वतीने आवश्यक सुविधा पुरवण्याबरोबरच परवानग्यांसाठी एक खिडकी कार्यान्वित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

नियोजनभवनात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत आगामी सण उत्सवाच्या नियोजनासाठी बैठक झाली.यावेळी जि. प मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, मनपा आयुक्त डॉ.सुनील लहाने, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, अपर पोलिस अधीक्षक सीके रेड्डी, सार्वजनिक उत्सव मंडळाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.बैठकीत प्रारंभी विविध विभागांमार्फत सार्वजनिक मंडळांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांची माहिती देण्यात आली.शहरातील सार्वजनिक उत्सव मंडळांना सर्व परवानग्या एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मनपाच्या वतीने एक खिडकी कार्यान्वित करण्यात येईल तसेच ग्रामीण स्तरावर पोलीस ठाण्यात कार्यान्वित करण्यात यावी. नियमित पाणीपुरवठा, मिरवणूक मार्गावर पुरेशी वीज व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य पथके आदी तजवीज ठेवावी.

अकोला जिल्ह्याला सण उत्सवाची वैभवशाली परंपरा आहे.ती अबाधित रहावी विसर्जन घाटावर आवश्यक सुविधा पूरवाव्यात असे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी दिले.उत्सव काळात ध्वनिप्रदूषण होऊ नये यासाठी ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यंत्रणेचा वापर करण्याबाबत नियमांचे पालन व्हावे असे आवाहन मनपा आयुक्त डॉ सुनील लहाने यांनी केले.जिल्ह्यात १ हजार ३५६ सार्वजनिक नवदुर्गा मंडळाची नोंदणी झालेली आहे. पोलीस विभाग कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कटीबद्ध आहे.

पोलीसांतर्फे पुरेशा पोलीस बंदोबस्त व दामिनी पथक सज्ज असेल.सण उत्सव काळामध्ये पोलीस विभागाच्या वतीने गुन्हेगारी प्रवृत्ती असणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती अपर पोलीस अधीक्षक सीके रेड्डी यांनी केली.नवरात्री उत्सवाचे अष्टमी व नवमी या दोन दिवस रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक वापरण्यास मुभा देण्यात आली आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील यांनी दिली.यावेळी उपस्थित नवदुर्गा उत्सव मंडळ,गरबा समिति पदाधिकारी यांनी विविध मुद्दे मांडले.

## सुटीच्या दिवशीही पाणी पट्टी कर सुरु राहणार

▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नळ धारकांना त्यांचे पाणी पट्टी कर भरणे अधिक सोईचे व्हावे याकरिता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये शनिवार दि. १३ आणि रविवार दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी सुद्धा कार्यालयीन वेळेमध्ये अकोला महानगरपालिकेचा जलप्रदाय विभाग हे सुरू राहणार आहे. कृपया संबंधीत नळ धारकांनी याची नोंद घेऊन या संधीचा लाभ घ्यावा. शहरातील सर्व नळ जोडणी धारकांनी या विशेष सोईचा लाभ घेऊन थकित व चालू वर्षातील पाणी पट्टी कर भरणे तसेच पाणी पट्टी देयकाविषयी काही तक्रार असल्यास ते दुरूस्त करून घेऊन आपला थकित पाणी पट्टी कराचा भरणा करून मनपा प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन मनपा जलप्रदाय विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे.

## आज पर्यंत प्रारूप प्रभाग रचनावर एकुण १८ हरकती प्राप्त

▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :

अकोला महानगरपालिकेची आगामी काळात होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी अकोला महानगरपलिकेची प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यात आली आहे.

त्यावर हरकती व सुचना मागविण्यासाठी ३ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत वेळ देण्यात आली आहे.या अनुषंगाने आज दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी, प्रभाग क्रं. १५ मध्ये काही भाग राष्ट्रीय महामार्ग ०६ ओलांडून दुस-या प्रभागामध्ये गेलेले आहे, तरी हे भाग प्रभाग क्रं. १५ मध्येच समाविष्ट करणे बाबतच्या २ हरकती.

मनपाच्या येणा-या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये दि. ०३/०९/२०२५ रोजी जाहीर झालेल्या प्रभाग रचनेच्या नकाशावर आक्षेप घेणे बाबत १ हरकती. ए.पी.एम.सी. मार्केट ते रेल्वे बोगद्यापर्यंतचा भाग प्रभाग क्रं. ७ मध्ये समाविष्ट करणे बाबत १ हरकती.

अकोला महानगरपालिकेव्दारा प्रसिध्द प्रारूप प्रभाग रचनेमधील प्रभाग क्रं. ३ च्या रचनेवर आक्षेप घेणे बाबत १ हरकती. अकोला महानगरपालिका प्रभाग क्रं. १२ मधील प्रगणक गट क्रं. ४०७, ४०९ व ४१४ प्रभाग क्रं. ११ मध्ये समाविष्ट करणेबाबत १ हरकती. अकोला महानगरपालिका प्रभाग क्रं. १२ मधील प्रगणक गट क्रं. ४११ प्रभाग क्रं. ११ मध्ये समाविष्ट करणे बाबत १ हरकती. प्रभाग क्रं. २० मधील प्रभाग रचना (प्रगणक गट क्रं. ६४४ व ६२६) वरील अक्षेप बाबत १ हरकती आणि प्रभाग क्रं. १ व २ मध्ये दुरूस्ती करणे बाबत १ हरकती मिळून एकुण ९ हरकती प्राप्त झाल्या असून आजपर्यंत एकुण १८ हरकती नोंदविण्यात आल्या आहेत.

## अल्पभूधारक शेतकऱ्याची आत्महत्या;विष प्राशन केल्यानंतर घेतला गळफास

**हिवरखेड :** कर्जाच्या बोझ्याने व सततच्या नापिकीमुळे त्रस्त होऊन मानसिक तणावात गेलेला युवा शेतकरी कृष्णा बळीराम गावंडे याने आत्महत्या केली आहे.हिमतीने खचून गेल्यामुळे त्याने आपल्या शेतात जाऊन दुपारी ३ वाजेदरम्यान विष प्राशन केले व नंतर लिंबाच्या झाडाला गळफास घेतला. ही घटना १० सप्टेंबर रोजी चिचारी शेत शिवारात घडली.शेतकरी कृष्णा गावंडे यांच्याकडे दोन एकर शेत असून त्याने या वर्षी शेतात तुरीचे पीक पेरले होते. निसर्गाचा लहरीपणा व पावसाच्या अनियमिततेमुळे पीक हातचे गेले. आर्थिक अडचणीत असलेल्या गावंडे कुटुंबावर आधीच बँकेच्या कर्जाचा बोजा होता. या दुहेरी संकटामुळे कृष्णा गेल्या काही दिवसांपासून मानसिक तणावाखाली होता. त्याने बुधवारी आपल्या शेतात जाऊन दुपारी ३ वाजेदरम्यान विष प्राशन केले व नंतर लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन जीवनयात्रा संपविली. याबाबत हिवरखेड पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेहाचे तेल्हारा येथील रुग्णालयात शासकीय शवाविच्छेदन केले. कृष्णाच्या अचानक जाण्याने मराठा नगर परिसरात शोककळा पसरली आहे. त्याच्या पश्चात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे. आधीच आर्थिकदृष्ट्या खचलेल्या या परिवाराला शासनाने तातडीची मदत करावी.

## अकोला जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सर्व प्रश्न निकाली काढणार : शिक्षणाधिकारी मोहरे

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

जिल्हा माध्यमिक, उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या सभेचे आयोजन करण्यात आले. जिल्हयातील माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांची एकही समस्या शिलक राहू देणार नाही असे शिक्षणाधिकारी अरविंद मोहरे यांनी सभेत सांगितले.जिल्हयातील विविध शैक्षणिक समस्या संदर्भात या सभेमध्ये चर्चा करण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने एक तारखेला नियमित पगार करण्यात यावा, जिल्ह्यातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांचे समयोजन त्वरित करावे, जिल्हयातील बदली शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी प्रस्तावांना त्वरित मान्यता देण्यात यावी.



मुख्याध्यापक आणि शिक्षकांचे वैयक्तिक मान्यता त्वरित देण्यात यावी, संच मान्यते मधील त्रुटी त्वरित दुरुस्त करून देण्यात याव्यात शिक्षकांना परतावा न परतावा भविष्य निर्वाह निधी प्रत्येक महिन्याला बिल स्वीकारावे वेतनेत्तर अनुदान देण्यात यावे वैद्यकीय बिल त्वरित निकाली काढावे निवड श्रेणी वरिष्ठ त्वरित काढावीत बायोमेट्रिक विद्यार्थ्यांना टॅब शाळांना देण्यात यावा मुख्यमंत्री सुंदर शाळा पुरस्कार वितरणाचे पैसे त्वरित माध्यमिक शाळा पुरस्कार प्राप्त शाळांना देण्यात यावेत. इत्यादी विविध प्रश्न संदर्भीत चर्चा करण्यात आली आणि ही प्रश्न त्वरित निकाली काढावी या दृष्टीने शिक्षणाधिकारी यांनी अतिशय चांगल्या प्रकारे चर्चा केली.या प्रसंगी शिक्षणाधिकारी कार्यालयामधील प्रमुख टेकाळे, कोल्हे, करवते आदींनी सहभाग घेतला. याप्रसंगी राज्य मुख्याध्यापक संघ उपाध्यक्ष शत्रुघ्न बिडकर, विदर्भ कार्याध्यक्ष बळीराम झांबरे, जिल्हा अध्यक्ष विलास खुमकर, कार्याध्यक्ष विजय ठोकळ, जिल्हा सचिव दिनेश तायडे, उपाध्यक्ष आनंद साधू, दिनकर गायकवाड, रमेश चव्हाण, शहराध्यक्ष माधव मुंशी, शहर सचिव दीपक बिडकर आदी उपस्थित होते. सागर देशमुख तालुका अध्यक्ष पंकज इंगळे पातुर बाळापुर इंगळे रमेश चव्हाण बंड १ प्रामुख्याने मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी प्रसंगी उपस्थित होते.

## जानोरकर मंगल कार्यालयात भव्य भागवत व कीर्तन महोत्सव

### अकोला–पितृपक्षाच्या पावन पर्वावर पितृसेवा भागवत कथा आयोजन समितीच्या वतीने

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

रविवार दिनांक १४ सप्टेंबर पासून तो २० सप्टेंबर पर्यंत नित्य दु २ ते साय ५ वाजेपर्यंत रिंग रोड येथील जानोरकर मंगल कार्यालयात सात दिवसीय श्रीमदब भागवत व किर्तन उत्सव आयोजित करण्यात आला आहे.या भागवत कथेच्या प्रारंभी रविवार दि १४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता जानोरकर मंगल कार्यालय पासून परिसरात भव्य ग्रंथ दिंडी व कलश शोभायात्रा आयोजित करण्यात आली आहे.

या भागवत कथेत पु सद्गुरुदेव सुधांशु महाराज यांचे शिष्य आचार्य शिवदत्त महाराज हे संगीतमय भागवत कथा सादर करणार आहेत.या उत्सवात नित्य रात्री ८ वाजता कीर्तन उत्सव होणार आहे. हभप प्रशांत महाराज ताकोते यांच्या मार्गदर्शनात आयोजित या कीर्तनात रविवार दि १४ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता हभप उमेश महाराज दशरथे आळंदी हे कीर्तन करणार आहोत.सोमवार दि १५ सप्टेंबर रोजी अमानी येथील हभप विजय महाराज शास्त्री,मंगळवार दि १६ सप्टेंबर रोजी हभप शिवा महाराज बावस्कार बुलढाणा,बुधवार दि १७ सप्टेंबर रोजी हभप ज्ञानेश्वर महाराज शिंदे आळंदी,गुरुवार दि १८ सप्टेंबर रोजी हभप भगीरथ महाराज काळे सिन्नर, शुक्रवार दि १९ सप्टेंबर रोजी हभप जगन्नाथ महाराज पाटील मुंबई यांचे किर्तन होऊन शनिवार दि २० सप्टेंबर रोजी सकाळी १०–३० वाजता हभप प्रशांत महाराज ताकोते यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.तर कथा उत्सवाची सांगता दिनांक २० सप्टेंबर रोजी सकाळी ८ वा पूर्णाहुती व महाप्रसादाने होणार आहे.या कथा व कीर्तन उत्सवात महिला पुरुष भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन समितीचे अध्यक्षरामलाल अग्रवाल,कार्याध्यक्ष मनोहरराव खरापकार, वरीष्ठ उपाध्यक्ष पुरुषोत्तम वानखडे, उपाध्यक्ष प्रदीपसिंह गौर,दिगंबर सपकाळ,विक्रम जानोरकर,सचिव विश्वजित सिसोदिया, सहसचिव सुधाकर फुलारी, कोषाध्यक्ष जगदीश जोशी,आदींनी केले.

## महिनाभर चालणारे भुलाबाईचे सुर झाले लुप्त

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

गणेश विसर्जन झाल्यानंतर सर्व महिला वर्गांना भुलाबाईचे वेध लागत असत, गणपती विसर्जन झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून घरोघरी भुलाबाईची स्थापना केली जात असे, भुलाबाई उत्सवास घेऊन महिलांमध्ये विशेषता मुलींमध्ये विशेष उत्साह राहत असे परंतु आता भुलाबाईचा उत्सव केवळ पाच दिवसाचा किंवा एका दिवसा पुरता मर्यादित झाला आहे, भाद्रपद पौर्णिमा ते शरद पौर्णिमा या एक महिन्याच्या कालावधीत हा उत्सव आधि साजरा केला जात असे, घरोघरी भुलाबाईच्या विविधगीतांचे स्वर ऐकू येत असत परंतु आता बदलत्या परिस्थितीनुसार लोक संस्कृती बदलत चालली आहे आधी एक महिनाभर पाहुणे बनवून आलेल्या भुलाबाईच्या गीतांचे स्वर आता लुप्त होत चालले आहेत. शिक्षणामुळे होणार किंवा वेळेची कमी असल्याने हा सण केवळ आता शरद पौर्णिमे पुरता एका दिवसासाठी मर्यादित झाला आहे भुलाबाई माता पार्वती तर भुलोजीराजांना भगवान शंकराचे स्वरूप मानले जाते एक महिना आपल्या माहेरी आलेल्या भुलाबाईच्या भक्तीतून नवविवाहितांच्या सुखदुःखाचे वर्णन भुलाबाईच्या गाण्यातून होत असे.

## मधूवत्सल गोसेवा केंद्रात भव्य सामूहिक श्राद्ध तर्पण व पिंडदान संस्कार सोहळ्याचे आयोजन

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

अखिल विश्व गायत्री परिवार अंतर्गत पितृ पक्षाचे औचित्य साधून यावलखेड रस्त्यावरील मधूवत्सल गोसेवा केंद्रात रविवार दिनांक २१ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता साधकांसाठी मोफत भव्य सामूहिक श्राद्ध तर्पण व पिंडदान संस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या पितृ पक्षात पितृ दोषाच्या समस्या नष्ट होण्यासाठी व आयुष्य,पुत्र,यश,स्वर्ग, कीर्ती, बल, लक्ष्मी, पशु, धन,सौख्य,धान्य प्राप्तीसाठी हे संस्कार केल्या जातात.सर्वांसाठी मोफत असणाऱ्या या पितृपक्षातील श्राद्ध तर्पण व पिंडदान संस्कार सोहळ्याची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. गायत्री परिवाराचे प्रचारक,आचार्य डॉ सुरेश राठी यांच्या मार्गदर्शनात आयोजित या संस्कार सोहळ्याची नोंदणी सुरू असून साधकांनी हभप तुलसीदास महाराज मसने, गिरीश तोष्णीवाल, ओमप्रकाश गावंडे, मधुसूदन अग्रवाल, भरत मिश्रा, सुनील करनानी, अनिल शिंदे,सुनील कांबळे जानराव वानेटकर, रामभाऊ आदनाक,रमेश चांदुरकर,विजय सांगळे, राजूभाऊ वानखडे, संतोष काजे, मधुकरराव गावंडे, रमेश मुरूमकर, पुरुषोत्तम पागृत, गोविंदराव गावंडे आदींशी संपर्क करण्याचे आवाहन केले.

## सर्पमित्राने ५८ दिवस काळजी घेऊन दिले पिल्लांना जीवनदान !

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

खामगाव रोडवरील एका कार शोरूममध्ये पकडलेल्या धामण सापाने दिलेल्या १२ अंड्यांमधून पिल्ले बाहेर काढण्यात अकोला जिल्हा सर्पमित्र एम एच ३० ग्रुपचे सुरज इंगळे व अभय निंबाळकर यांना यश आले आहे. गेल्या ५८ दिवसांपासून या अंड्यांची योग्य काळजी घेऊन त्यांनी या सर्व धामण सापाच्या पिलांना जीवदान दिले.

आणि नंतर त्यांना नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडून दिले. १२ जुलै रोजी खामगाव रोडवरील एका कार शोरूममध्ये धामण जातीचा साप दिसल्याची माहिती सर्पमित्र सुरज इंगळे यांना मिळाली. तात्काळ घटनास्थळी पोहोचून इंगळे यांनी सापाला पकडले. सापाला नैसर्गिक अधिवासात सोडत असताना त्यांनी सापाने पिशवीत १२ अंडी दिल्याचे पाहिले. सर्पमित्रांनी सापाला सोडून



दिले आणि सर्व अंडी जपून घरी आणली. अभय निंबाळकर यांनी सापाची अंडी कृत्रिम रीत्या उबवण्यासाठी ती एका डब्यात रितसर रचून ठेवली.

त्यामध्ये लाकडी भुसा टाकून डब्याला ऑक्सिजनसाठी छिद्रे केली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्यांनी ५८ दिवस उबदार तापमान राखण्यासाठी विशेष काळजी घेतली. त्यांच्या या अथक प्रयत्नांमुळे, ५८ दिवसांनंतर सर्व १२ अंड्यांतून पिल्ले सुखरूप बाहेर आली. सर्व पिल्ले सुरक्षित असल्यामुळे सुरज इंगळे व अभय निंबाळकर यांनी समाधान व्यक्त केले. ही सर्व पिल्ले बिनविषारी धामण जातीची असल्याने त्यांना नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडून देण्यात आले आहे. सर्पमित्र सुरज इंगळे व अभय निंबाळकर म्हणाले, 'कार शोरूममध्ये पकडलेला धामण साप सोडताना त्याने पिशवीत अंडी दिल्याचे आमच्या लक्षात आले.

ती अंडी घरी आणून योग्य तापमानात उबवण्याची प्रक्रिया पार पाडली. सर्व १२ अंड्यांतून पिल्ले सुखरूप बाहेर आल्याचे आम्हाला खूप समाधान आहे. या सर्व पिलांना सुरक्षित अधिवासात सोडले आहे. '

## थोडक्यात

### रानडुकराचा हल्ला,महिला गंभीर

**मूर्तिजापूर:** शेतात गवत कारण्याकरिता गेलेल्या खांदला येथील मजूर महिलेवर रानडुकराने अचानक हल्ला करून या महिलेला जबर जखमी केल्याची घटना ९ सप्टेंबर रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास घडली. दैव बलवत्तर म्हणून या महिलेचे प्राण वाचले अन्यथा मोठी अप्रिय घटना घडली असती, याबाबत प्राप्त माहितीनसार, तालुक्यातील शेवटचे गाव असलेले खांद्याला येथील शोभा प्रकाश वरघट वा ९ सप्टेंबर रोजी पिंपळसेंडा शिवारात सोयाबीन मधील गवत कापण्याकरिता गेल्या होत्या. गवत कापत असताना सोयाबीन मधून अचानक धावत येऊन रानडुकरांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. हल्लयामध्ये शोभाबाई अक्षरशः रक्तबंबाळ झाल्या होत्या. त्यांच्या उजव्या हाताला जबरदस्त दुखापत होऊन हात फॅक्चर झाला. दैव बलवत्तर म्हणून त्यांचे प्राण वाचले. त्यांना तत्काळ मूर्तिजापूर येथील श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात उपचारार्थ गावातील सरपंच प्रवीण पाटील यांनी दाखल केले. त्यांच्या हाताला झालेल्या फॅकरमुळे त्यांना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शस्त्रक्रियेसाठी अकोला येथे हलवण्याचे सांगितले. त्यामुळे एका गरीब मजूर महिलेवर मोठे आर्थिक संकट आले आहे. त्यांच्या पतीचा मृत्यू झाला असून, कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर असल्याने कुटुंबावर संकटच कोसळले आहे. त्यामुळे वन विभागाने याची दखल घेऊन तत्काळ या महिलेला आर्थिक मदत करावी, अशी मागणी गावकऱ्यांच्या वतीने केल्या जात आहे. रानडुकराने केलेल्या हल्लया संदर्भात ग्रामीण पोलिस स्टेशन तसेच फॉरेस्ट कर्मचारी यांना माहिती देण्यात आली आहे. या घटनमुळे परिसरातील गावकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने तत्काळ कारवाई करून रानडुक्कराला जेरबंद करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणी संबंधित महिलेवर उपचार करण्यात आले आहे. सुदैवाने कोणतीही जिवितहानी झाली नसल्याचे गावकऱ्यांनी या वेळी सांगितले.

### जावयाच्या हत्या प्रकरणातील आरोपींना सोमवारपर्यंत पोलिस कोठडी

**पातूर :** तालुक्यातील अंबाशी गावाच्या आसोला फाटा येथे घरगुती वादातून १० सप्टेंबर रोजी जावयाची निर्घृण हत्या करण्यात आली होती. यातील आरोपींना पोलिसांनी शर्थीचे प्रयत्न करीत एका तासात अटक केली होती. या तीनही आरोपींना गुरूवार ११ सप्टेंबरला पातूर न्यायालयात हजर केले असता सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.अंबाशी येथील छाया हिवराळे हिचा विवाह अकोला तालुक्यातील कानशिवणी येथील नागेश पायरुजी गोपनारायण यांच्याशी १० वर्षापूर्वी झाला होता. मात्र दारूच्या व्यसनामुळे छाया व नागेश यांच्यामध्ये वाद होत होते. या वादाला कंटाळून छाया गेल्या सहा महिन्यांपासून माहेरी राहत होती. १० सप्टेंबरला सायंकाळी नागेश असोला फाटा येथे मेहुणीच्या घरी आला असता, पत्नी कुठे आहे, म्हणत सासुरवाडीत वाद घालण्यास सुरुवात केली. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यामध्ये नागेशयांच्यावर तीक्ष्ण हत्याराने वार करून त्यांची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी पातूर पोलिसांनी युद्ध स्तरावर आरोपीचा शोध घेत एका तासात सिद्धार्थ शांताराम चोटमल, रेखा शांताराम चोटमल व नंदा दिलीप डोंगरे यांना अटक केली होती. त्यांना आज गुरुवारी न्यायालयात हजर केले असता सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणी पुढील तपास पातूर पोलिस करीत आहेत.

### जयहिंद चौकात फळ विक्रेत्यांचे अतिक्रमण

**अकोला :** अकोला महानगरातील रस्त्याच्या दोन्ही कडेला अतिक्रमणधारकांनी केलेले अतिक्रमण प्रशासन आणि शासनाने जरी काढले असले तरी अकोला शहरातील जय हिंद चौक येथे रस्त्याच्या दोन्ही बाजूला फळ विक्रेत्यांनी अतिक्रमण केले आहे परिणामी या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होत आहे. सदर अतिक्रमण काढल्यास या रस्त्यावर नागरिकांना ये जा करण्यास सुविधा होईल अशी मागणी अकोलेकर नागरिक करीत आहे. रस्त्यावर हातगाड्या लावण्यासशासनाने बंदी घातली आहे परंतु हातगाडी वर व्यवसाय करणारे लघु व्यावसायिक रस्त्याच्या कडेला खाली बसून आपली दुकान थाटून व्यवसाय करीत असल्याचे चित्र महानगरात पहावयास मिळत आहे.

## एसटी प्रवर्गाच्या आरक्षणासाठी बंजारा आंदोलन उभारणार

**बार्शिटाकळी** : राज्यातील मराठा – कुणबी आरक्षणानंतर आता बंजारा समजाचे एसटी प्रवर्गाचे आंदोलन राज्यात उभारले जात आहे. गुरुवार दि. ११ सप्टेंबर रोजी बंजारा समाजाच्या वतीने, बंजारा समाजाचा रळ प्रवर्गात समावेश करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना, तहसीलदार बाशीटांकी यांचे मार्फत निवेदन देण्यात आले आहे.बंजारा समाजाला महाराष्ट्र राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती या संवगातून अल्प आरक्षण दिले असून यामध्ये एकूण ४२जाती व १४जमाती यांचा व ३७ भटक्या जमातीचा समावेश आहे. या जाती बलुतेदार नसुन देखील त्यांना ओ.बी.सी. मध्ये दाखविण्यात आले आहे. आज बंजारा समाज तेलंगणा, आंध्रप्रदेश, तामीळनाडु अशा अनेक राज्यात अनुसूचित जमाती या प्रवर्गात येत असून अखिल भारतीय पातळीवर बंजारा समाज व त्यांचे सण, उत्सव, भाषा, पेहराव एक असल्याचे वधवा समितीने म्हटले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान चर्चा खंड ५ मध्ये बंजारा समाजाला अनुसूचीत जमातीचे आरक्षण मिळावे म्हणुन आग्रह धरला होता व खंड ५ मध्ये बंजारा समाज अनुसूचीत जमाती आपणआरक्षणाचे हकदार आहे असे म्हटले आहे. बंजारा समाजाचा अनेक सामाजिक संघटनांनी ५० वषार्पासून सतत मागणी आरक्षणाची करत आहेत. स्वतः नंगारा भवन भूमिपुजनाच्या वेळेस बंजारा समाजाचे धर्मगुरु डॉ. रामराव महाराज यांनी आपणास दिलेल्या निवेदनात बंजारा समाजाला रळ. प्रवर्गात समाविष्ट करण्याचे जे निवेदन दिले होते त्यानुसार लाखो बंजारा समुदायाचे उपस्थितीत मुख्यमंत्री यांनी बंजारा समाजाला एस. टी. प्रवर्गात समाविष्ट करण्याचे जाहीर केले होते.धर्मगुरु डॉ. रामराव महाराज यांची शेवटची इच्छा पूर्ण करावी.

### अकोला येथे हिंदु मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणी

## राज्यसभेत नराधमांविरोधात कठोर कायदा करा

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

अकोला येथे हिंदु मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणी राज्यसभेत



नराधमांविरोधात कठोर कायदा करा अशी मागणी समाजसेविका कमलजीत कौर यांनी राज्यसभा सदस्य अनिल बोंडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या विषयाची दखल घेत त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून संपूर्ण विषयाची माहिती देवून कठोर कारवाई करण्याचे आदेशित करावे अश्या स्वरुपाची चर्चा करण्यात आली.सध्या विकृत मानसिकता ही संपूर्ण देशासह महाराष्ट्रात अतिरेक करित असून याच्या अनेक समाजाच्या मुली ह्या बळी पडत आहे. संपूर्ण देशातील महिला वर्गाचे संरक्षण होण्याकरिता राज्यसभेत अश्या नराधमांविरोधात कठोर कायदा करुन त्यांना कठोरात कठोर अथवा फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदन देतेवेळी डॉ. १००८ श्री शक्तीजी महाराज, समाजसेविका कमलजीत कौर, मयुर राजेश शर्मा, केल्वीन सुबी, करनी सेना अध्यक्ष आकाश ठाकुर आदींसह शिष्टमंडळाने भेट घेतली.

## अकोल्यात तुरळक पाऊस

अकोला :पितृ पंधरवड्यात कमालीचा उष्मा जाणवत आहे. तसेच अधूनमधून ढगाळ वातावरण राहते. गुरूवारी रात्री शहरासह जिल्ह्याच्या काही भागात पाऊस झाला. शुक्रवारी सकाळी देखील पाऊस झाला. दमदार नसला तरी ओले करणारा पाऊस होता. सप्टेंबर महिन्यात पावसाचा अंदाज व्यक्त केला जातो आहे. यंदा अतिवृष्टी झाली. त्यामुळे जलसाठ्यात वाढ झाली परंतु पिकांचे नुकसान झाले. नुकसान भरपाई कडे आता शेतकरी डोळे लावून बसले आहेत. आता यापुढे होणारा पाऊस पिकासाठी मारक ठरू शकतो. अधूनमधून पाऊस होतो परंतु उष्मा मात्र कमी होत नाही. पंखे सतत सुरू ठेवावे लागत असल्याने विजेचे बिल वाढत आहे. काही घरात तर कूलर, एसी अजून ही आहेत. बदलत्या वातावरणामुळे प्रकृतीच्या सुरू तक्रारी देखील वाढल्या आहेत.

### जिल्हास्तरीय विद्यार्थी विज्ञान मेळावा

## विज्ञान नाट्योत्सवात प्रभात किड्स प्रथम



**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

राज्य विज्ञान शिक्षण संस्था रविनगर नागपुर, शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद अकोला, जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ अकोला व प्रभात किड्स स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा व विज्ञान नाट्योत्सव यांची जिल्हास्तरीय फेरी शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद अकोला डॉक्टर अरविंद मोहरे यांचे मार्गदर्शनात बुधवार, दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी प्रभात किड्स वाशिम रोड अकोला येथे उत्साहात पार पडली.या स्पर्धेत तालुक्यातून निवड झालेल्या नाट्यमध्ये १३ शाळांनी तर विद्यार्थी विज्ञान मेळावा मध्ये १६ शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. विद्यार्थी विज्ञान मेळाव्यामध्ये प्रभात किड्स स्कूलची गार्गी गरकल हिने प्रथम तर बालशिवाजी शाळेचा आयुष जळमकर याने द्वितीय क्रमांक प्राप्त करून विभागीय स्तर मेळाव्यासाठी यांची निवड करण्यात आली. विज्ञान नाट्योत्सवात प्रभात किड्स स्कूलच्या नया उजाला या विज्ञान नाट्याने प्रथम क्रमांक मिळवून विभागस्तरावर झेप घेतली. तसेच उत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषीक प्रभात किड्सचे प्रमोद गोलडे यांनी पटकाविले. सर्वोत्कृष्ठ स्क्रीफ्ट लेखन व्यंकटेश बालाजी शाळा मूर्तिजापूर तर अभिनय प्रथम मुलींमधून अ. जा. मुलींची शाळा बाळापूरची लुंबीनी सरदार व मुलांमधून प्रथम आले.

### छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत

## दहिगाव अवताडे येथे शिवार फेरी




**▪तेल्हारा,दि १२ (प्रतिनिधी) :**

तेल्हारा तालुक्यातील दहिगाव अवताडे येथे नकाशावर असलेले व नसलेले शेत रस्ते कायमस्वरूपी मोकळे करून नोंदणीकृत ठेवण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलली आहेत. त्या उपक्रमाचा भाग म्हणून दहिगाव येथे शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. त्या निमित्याने ग्रामपंचायत मध्ये तहसीलदार समाधान सोनवने,मंडळ अधिकारी संजय साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती.शिवार फेरी बाबत तहसीलदार यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.शिवार फेरीत नकाशावर असलेले परंतु बंद पडलेले अतिक्रमित रस्ते,सध्या वापरात असलेले शेत रस्ते यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. कार्यक्रमास तहसीलदार समाधान सोनवणे,तेल्हारा मंडळ अधिकारी संजय साळवे,सरपंच रविकिरण काकड,पोलीस पाटील अरविंद अवताडे,तलाठी जिवन राठोड,कृषी सहाय्यक अनिता डाबेराव,उपसरपंच धरमसिंग उपस्थित होते.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१–८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

